# गोष्ट – आभाळ पडले

माकडाने पिलाची गंमत करायचे ठरवले. झाडाचे पान त्याच्यावर टाकायचे ठरवले. माकडाने झाडाचे पान पिलाच्या पाठीवर टाकले. पिलू घाबरले. त्याला वाटले आभाळ पाठीवर पडले. ते पळू लागले. वाटेत भेटला ससा.

ससा – अरे, थांब थांब. असा का पळतोस?

पिलू – आभाळ पडलं, पळ पळ.

पिलाने सशाला घाबरवले. ससा पण पिलाबरोबर पळू लागला. वाटेत भेटले बदक.

ससा – आभाळ पडलं, पळा, पळा, जीव वाचवा.

बदक – अरे, थांबा थांबा. असे का पळता?

सशाने बदकाला आभाळ पडल्याचे सांगितले. बदकही त्यांच्याबरोबर धावू लागले.

माकड – अरे, थांबा, थांबा. असे का पळता?

पिलू – अरे, पळ, पळ, आभाळ पडले. जीव वाचव.

माकडाने सर्वांना थांबवले व का पळता म्हणून विचारले.

माकड – अरे, वर बघा. काय आहे?

ससा – आभाळ.

बदक – अरे, ते तर जागेवरच आहे.

पिलू – मग माझ्या पाठीवर काय पडलं?

माकड – अरे, ते तर झाडाचं पान. मीच टाकलं होतं तुझ्या अंगावर.

शेवटी उलगडा झाला. पान मीच टाकल्याचे माकडाने सर्वांना सांगितले. सगळे हसू लागले.